# आदिवासी अल्पवयीन मुलीवर तरुणाचा पाशवी अत्याचार

## सातपुड्यातील जिरायतपाडा येथील घटना; संशयित आरोपीची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**चोपडा । प्रतिनिधी**

लघुशंकेसाठी रात्री घराच्या बाहेर अंगणात गेलेल्या आदिवासी अल्पवयीन मुलीवर पाळत ठेवणाऱ्या गावातील १९ वर्षीय तरुणाने मुलीचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने अंधारात ओढत नेऊन एका बंद घरात तिच्यावर पाशवी अत्याचार केल्याची घटना नुकतीच जिरायतपाडा गावात घडली. अत्याचाराच्या घटनेने आदिवासीं बांधवांसह चोपडा तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या संशयित तरुणाला पोलिसांनी शुक्रवारी रात्रीच ताब्यात घेऊन अटक केली. दरम्यान संशयित तरुणाला शनिवारी दुपारी न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सातपुड्यातील जिरायतपाडा येथे आदिवासी कुटुंब मुलाबाळांसह वास्तव्यास असून, दि.३१ जुलै रोजी रात्री कुटुंबातील सर्वजण झोपी गेले. दरम्यान रात्री ११ वाजता १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी लघुशंकेसाठी घराच्या बाहेर अंगणात आली असता ती घरात परत आलीच नाही म्हणून मुलीच्या वडिलांनी रात्रभर जिरायतपाडा गावात शोधाशोध केली परंतु ती कुठेच आढळून आली नाही. आई, वडिलांसह सर्वच कुटुंब चिंतते असतांना पहाटे ४ वाजेच्या सुमारास अल्पवयीन मुलगी घाबरलेल्या अवस्थेत रडत घरी परतली यावेळी वडिलांनी अल्पवयीन मुलीला विचारले असता तिने सांगितले की, लघुशंकेसाठी घराच्या बाहेर अंगणात गेली असता माझेवर पाळत ठेवणाऱ्या गावातील तरुणाने दोन्ही हातांनी माझे तोंड व हात बांधून जबरदस्तीने अंधारात ओढत नेऊन मुलीच्या नातेवाईकाच्या बंद असलेल्या घरात तब्बल पाच तास डांबून ठेवत पहाटे ४ वाजेपर्यंत पाशवी अत्याचार केला. त्यानंतर संशयित तरुणाने मला घरापर्यंत सोडले, अशी आपबिती अल्पवयीन मुलीने सांगितली. अत्याचाराच्या घटनेने आदिवासी कुटुंबच हादरले असून, जिरायतपाडा गावात प्रचंड खळबळ उडाली आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलीचे वडिल हिरमल जेमाल पावरा (वय ४७, रा.जिरायतपाडा, ता.चोपडा) यांच्या फिर्यादीवरुन ग्रामीण पोलीस स्टेशनला गुरनं २१३/ २०२५ नुसार भारतीय न्यायसंहिता कलम १३७ (२), ६४ (२), (i) (m),६५ (१), ११५ (२), ३५१ (२) पोक्सो ३, ४(२), ५ (L), ६, ७, ८ प्रमाणे स्नेहल दिलीप पावरा (वय १८ वर्ष, सहा महिने, रा.जिरायतपाडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटक करण्यात आली आहे. पुढील तपास डीवाय.एस.पी.आण्णासाहेब घोलप, ग्रामीणचे पोलीस निरीक्षक महेश टाक यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शेषराव नितनवरे करीत आहेत.

# राजवड येथे माजी आ.साहेबराव पाटलांच्या घरात चोरी

## ग्रा.पं.च्या कार्यालयाबाहेर लावलेल्या कॅमेऱ्यात चार चोरटे कैद; चार पथके रवाना

**पारोळा । प्रतिनिधी**

तालुक्यातील राजवड येथील माजी आमदार कृषीभूषण साहेबराव धोंडू पाटील यांच्या घरावर दि.१ ते २ ऑगस्टच्या मध्यरात्री अज्ञात चार चोरट्यांनी घरात घुसून ३४ लाख ८ हजार रुपयांचा ऐवज लांबविला आहे. यात १० लाख रुपये रोख व सोने-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे.



याबाबत राजवड येथील माजी आमदार साहेबराव पाटील व पुष्पलताताई पाटील या कुटुंबासह बाहेरगावी गेलेले असताना चोरट्यांनी बंद बंगल्याचा डाव साधून चार जणांनी रेनकोटसारखे कपडे घालून तोंडावर टोपी व मास हातात हॅण्डग्लोज पूर्ण पॅक केलेले धरणगावकडील रस्त्याकडे गाडी लावून बंगल्यासमोर लावलेल्या सागाच्या झाडांमधून घुसून बंगल्यात घुसले ते दोन वाजून २९ मिनिटांनी बंगल्यात घुसले तर ३५ मिनिटानंतर घर साफ करून बाहेर निघाले. त्यांनी घरातून आणलेल्या पिशव्या या बंगल्यासमोर असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ खाली करून त्यांच्याजवळ असलेल्या पाठीवरच्या बॅगांमध्ये चोरलेले साहित्य टाकून खाली पिशव्या तेथेच फेकून धरणगाव रस्त्याकडे निघून गेले तसेच बंगल्याभोवती लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे व डी.व्ही.आर.देखील काढून घेऊन गेले आहेत. घटनास्थळी श्वानपथक मागविण्यात आले होते. श्वानपथकाने बंगल्यापासून पाण्याच्या टाकीपर्यंत जाऊन तिथपर्यंत मार्ग दाखविला तसेच घटनास्थळी ठसे तज्ज्ञ फॉरेन्सिक लॅबची व्हॅन व पथकाने जाऊन चोरट्याने ज्याठिकाणी हात लावले व सामान अस्ताव्यस्त फेकल्या ठिकाणाचे ठसे तसेच नमुने घेतले आहेत. सदर चार चोरटे हे राजवड ग्रामपंचायतीच्या कार्यालयाबाहेर लावलेल्या कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. या चोरीत ३४ लाख ८ हजार रुपयांचे दागिने चोरीस गेल्याचे समजले आहे.

राजवड येथे घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक चाळीसगाव कविता नेरकर, अमळनेर विभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पारोळा पोलीस निरीक्षक सचिन सानप, सहायक पोलीस निरीक्षक योगेश महाजन, जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील, उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे, संदीप पाटील, हरिलाल पाटील, प्रवीण मांडोळे, राहुल कोळी, यांचे पथक ठाण मांडून होते. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

# पोहरा येथे बसच्या चालकाने गळफास घेतला

**चाळीसगाव । प्रतिनिधी ।** तालुक्यातील पोहरे येथे एसटी बस चालकाचा दारूच्या नशेत दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह घरात आढळून आला आहे. ही आज शनिवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास उघडकीस आली, याप्रकरणी मेहुणबारे पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

पोहरे येथील रहिवासी तथा एसटी बसचे चालक भास्कर सोमा माळी (४५) हे मेहुणबारे गावी कुटुंबासह राहत होते. शेतीच्या कामासाठी ते १५ दिवसापासून पोहरे येथे राहत होते. आज २ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास भास्कर माळी यांचे भाऊ अशोक माळी हे घरात ठेवलेले खत घेण्याकरीता गेले असता घराचा दरवाजा उघडा दिसल्याने त्यांनी आवाज दिला. बराच वेळ झाला तरी भास्कर माळी हे दरवाजा उघडत नसल्याने भाऊ व घराशेजारी लोकांनी दरवाजा उघडला असता, भास्कर माळी हे दरवाजाला लाकडी खुंटीला दोरीच्या लागून असलेल्या भिंतीतील सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले.

त्यांना खाली उतरावून मेहुणबारे ग्रामीण रूग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषीत केले. त्यांनी दारूच्या नशेत गळफास घेतल्याने भास्कर माळी यांचा मृत्यु झाल्याची खबर अशोक सोमा माळी यांनी दिल्यावरून मेहुणबारे पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.



# कठोर मेहनत यशाचा मार्ग-सपोनि हरिदास बोचरे

**निंभोरा बु.।।, ता.रावेर । वार्ताहर**

शिस्त व कठोर मेहनत हाच यशाचा मार्ग आहे, असे प्रतिपादन निंभोरा येथील न्यू इंग्लिश स्कूल हायस्कुलच्या वार्षिक बक्षीस वितरण समारंभनिमित्त प्रमुख अतिथी पदावरुन बोलतांना निंभोरा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिदास बोचरे यांनी आपले मत व्यक्त केले. सर्वप्रथम सरस्वती पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक टी.पी.बोरोले होते. यावेळी सपोनि हरिदास बोचरे, पत्रकार राजीव बोरसे, चेअरमन मोहन भंगाळे, तसेच सांस्कृतिक संचालक मंडळ व मान्यवर हस्ते एस.एस.सी केंद्रातून प्रथम आलेली विद्यार्थिनी प्रशांती चौधरी तसेच निंभोरा विद्यालयातून प्रथम आलेली विद्यार्थिनी वैष्णवी कैलास चौधरी, त्याचप्रमाणे इ.१२ वी वर्गातून प्रथम आलेली विद्यार्थिनी योगिता संजय गोरडकर तसेच १० वी व १२ वी या वर्गातील व इतर वर्गातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत सपोनि बोचरे, राजीव बोरसे, शिक्षक विजय पाटील, मुख्यध्यापक टी.पी.बोरोले, शालेय विध्यार्थिनी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सांस्कृतिक मंडळाचे चेअरमन मोहन भंगाळे, संचालक सुरेश चौधरी, सुधीर मोरे, गिरीश नेहेते, विजय बोडे, विवेक बोडे, हरीश नेहेते तसेच काशिनाथ शेलोडे, पालक कैलास चौधरी, विजय खाचणे, शाळेच्या पर्यवेक्षिका मंजुषा महाजन, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.डी.झांबरे, प्रास्ताविक पी.एस.भोगे व आभार एस.जी.सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामीण भागात आज कानुबाई रोटचे होणार पूजन

**साकळी, ता.यावल । वार्ताहर**

खान्देशातील अनेक कुळांचे दैवत असलेल्या कानबाई मातेच्या उत्सवाला दि.२ ऑगस्ट शनिवारपासून कानबाईचे आगमन होवून स्थापना केली जाईल.

रोट पूजनानंतर प्रसाद म्हणून त्याचे ग्रहण केल्यानंतर सोमवारी (दि.४) रोजी मोठ्या भक्तीभावात कानबाईचे विसर्जन होणार आहे.

खानदेशाशी अतुट संबंध असलेला कानबाई उत्सव अलिकडच्या काळात महाराष्ट्रासह नजिकच्या गुजरात आणि मध्यप्रदेश राज्यातील काही भागात स्थिरस्थावर झालेल्या खान्देशी कुटुंबातदेखील साजरा केला जातो. वर्षानुवर्षांच्या रुढी व परंपरांना छेद देत या उत्सवाला आता आधुनिकतेचे स्वरूप प्राप्त झाले असल्याने मोठ्या जल्लोषात हा उत्सव साजरा होत असतो. कानबाई मातेच्या उत्सवास काल (दि.२ ऑगस्टपासून) भाजी-भाकरचे रोट पूजन करून सुरुवात करण्यात येते. ३ ऑगस्ट रविवारी कानबाई मातेची स्थापना करण्यात येईल. कानुबाई ही खान्देशातील प्रमुख कुलदैवत मानली जात असल्याने सर्व समाजाच्या समाजातवतीने




कानबाईचा उत्सव धुमधडाक्यात भक्तीभावाने साजरा केला जातो.

श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षात कानबाईची पूजा करण्याची प्रथा आहे. सोमवारी भक्तीभावाने कानबाईला निरोप देत नदीवर विसर्जन करण्यात येते. विसर्जनासाठी गावागावात मोठी तयारी करण्यात आली आहे. बँड व ढोल पथकांना केले जाते. सवाद्य मिरवणू काढून कानबाईची गावातील सुरुवातीला मिरवणूक काढण्यात काढली जाते. मिरवणुकीनंतर गावाबाहेर नदीकिनारी कानबाईचे विसर्जन केले जाते.



# टायगर ग्रुप नियोजकपदी नितीन पवार यांची निवड

**धरणगाव । प्रतिनिधी ।** टायगर ग्रुप संस्थापक अध्यक्ष जालिंदर जाधव व टायगर ग्रुप राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी जाधव यांच्या आदेशानुसार संघटनेचे विचार व कार्य संपूर्ण धरणगाव शहरात पसरवण्यासाठी वरिष्ठ पदाधिकारीशी चर्चा करून नितीन पवार यांची टायगर ग्रुप धरणगाव शहर शाखा नियोजकपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना संघटनेची वाढ व संघटनेचे ध्येय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांचा निवडीबद्दल त्याना शहरातील सामाजिक राजकीय पदाधिकारी शुभेच्छा दिल्या.

# धरणगाव तालुका काँग्रेसच्या मागणीला अंशतः यश

**पाळधी, ता.धरणगाव । वार्ताहर ।** धरणगाव तालुका काँग्रेस कमिटीने धरणगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अधिकारी व कर्मचारी नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना अनेक योजनांपासून वंचित राहावे लागत आहे, शेतकऱ्यांची कामे होत नाहीत याकरता तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तातडीने अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सह्या घेऊन मागणीचे निवेदन जिल्हा कृषी अधीक्षक श्री कुर्बान तडवी यांना १७ जून २५ रोजी दिले होते. धरणगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या या मागणीला अंशतः यश मिळाले असून अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या तालुका कृषी अधिकारी या पदावर तालुका कृषी अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली आहे त्याचप्रमाणे तीन नव्या कृषी सहाय्यकांची ही नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल तालुक्यातील शेतकऱ्यांनी धरणगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अभिनंदन केले आहे. तरीही या कार्यालयात कृषी सहाय्यकांची कमतरता आहे ती भरून काढावी यासाठी धरणगाव तालुका काँग्रेस कमिटी पाठपुरावा करणार आहे, असे धरणगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.व्ही. डी.पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, गोकूळ पाटील, कदीर पटेल, ताराचंद महाराज, चंपालाल भदाणे, साजिद पटेल, शेख बशीर, हंसराज पाटील, किरण अत्तरदे, ज्ञानेश्वर बाविस्कर आदींनी माहिती दिली आहे.

पान १ वरुन...

# रोहिणी खडसेंनी घेतली शरद पवारांची भेट

होते आणि त्याच दिशेने चौकशी झाली पाहिजे अशी त्यांची मागणी होती. पोलिसांनी पाळत ठेवली असल्याच्या प्रश्नावर, पोलिसांनी भेटून पाळत ठेवण्याचा हेतू नव्हता असे स्पष्टीकरण दिल्याचे खडसे यांनी नमूद केले.

दरम्यान, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिव्याखाली अंधार अशी टीका केली होती. त्यावर रोहिणी खडसेंनी करू द्या अशी प्रतिक्रिया दिली. तसेच, विरोधी पक्षातील नेत्यांना जाणूनबुजून लक्ष्य केले जात असल्याच्या प्रश्नावर, मसगळ्या विरोधी पक्षातील नेत्यांना असं म्हणायला जागा आहेफ असे उत्तर देत, सध्याच्या सरकारकडून बोलणाऱ्यांवर कारवाई होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. गृहमंत्र्यांसोबत या प्रकरणी अजून कोणतीही चर्चा केली नसल्याचेही त्यांनी सांगितले.

अशोक एअरकुल्ड DOLBY DIGITAL मे अखिल भारतीय प्रिमीयर रिलीज शुभारंभ ता. ३१ से रोजाना १२, ३, ६ व ९ बजेसे एक्शन, ड्रामा, मारधाड से भरपूर फिल्म




साम्राज्य
(हिंदी में)
कलाकार-विजय देवरकोंडा, भाग्यश्री बोरसे, सत्यदेव, इ.
(नोट - फिल्मके चारो शो चालू रहेंगे)
(टिप - BMS पर online Booking शुरु हो चूकी है।)

## निधन वार्ता



### संजय गोपाळ पाटील

**साकेगाव, ता.भुसावळ । वार्ताहर ।** साकेगाव येथील रहिवासी संजय गोपाळ पाटील (वय ३५) यांचे दि.२ रोजी सकाळी ३ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे.



### मधुकर भिका पाटील

**चोपडा । प्रतिनिधी ।** शहरातील देशमुख नगर येथील रहिवासी तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकर भिका पाटील (वय ८१) यांचे दि.२७ रोजी दुपारी २ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते इंजिनिअर प्रमोद पाटील व ग्रामविकास अधिकारी महेंद्र पाटील यांचे वडील होत.

**धुळे । प्रतिनिधी ।** वीज मीटरमध्ये छेडछाड करून एकूण पंधरा लाखांच्या विजेची चोरी करणाऱ्या ७ व्यक्तींविरोधात महावितरणने कारवाई करून पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. शहरातील ऐंशी फुटी रोडवरील सर्वे क्र. ८३ येथील हाजी मोहिनोद्दीन शेख (वय ५२) व सदिक अली अबीद अली यांनी वीज मीटरमध्ये छेडछाड केली होती. २२ एप्रिल रोजी साडेअकरा वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला.

**शुक्रवार १/८/२०२५**
मेन बाजार - १००-१५-१७७
मिलन ना. - ६८८-२१-१४६

**शनिवार २/८/२०२५**
कल्याण - ४५६-५८-४५९
मिलन डे - २८८-८२-२४६

## CHANGE OF NAME

मै एक्स हवलदार धुरंधर विजयकुमार मारोती जाहीर करता हूँ। मेरे पत्नी का पूर्ण नाम सौ.संगीता विजय धुरंधर जिसका हमारे शादी से पहले वाला नाम कु.अनिता समाधान सूर्यवंशी था। शादी के बाद सौ.संगीता विजय धुरंधर हो गया है। तथा इसकी जन्म ता.१८/०५/१९७९ है। जो डिस्चार्ज बुक मे गलतीसे १५/०५/१९७७ हो गयी है। सही जन्म ता.१८/०५/१९७९ है। तथा मेरा नाम धुरंधर विजयकुमार मारोती और बदलाव किया हुवा सही नाम विजय मारोती धुरंधर इस प्रकार है।

I Farooqui Mohammad Mukhtaruddin Salahuddin R/o Near Jama Masjid Marul Ta. Yawal Dist.Jalgaon have changed my name from Mohammed Mukhtar Salahuddin Farooqui to Farooqui Mohammad Mukhtaruddin Salahuddin.

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१-०६-२०२५ १४-०६-२०२५ | ५७९ ११ ३३५ | ९९० ८९ ५६८ | ३५६ ४० ५७८ | १६० ७६ ७९० | १५८ ४४ १६७ | १३३ ७५ १५९ |
| १६-०६-२०२५ २१-०६-२०२५ | ५७८ ०७ ११५ | २२० ४२ १३८ | ४४६ ४८ १२५ | १४८ ३३ ५९९ | २७८ ७२ ३९० | ६८९ ३४ ७७० |
| २३-०६-२०२५ २८-०६-२०२५ | १५९ ५३ २४७ | १२५ ८१ २३६ | २७९ ८१ १३७ | २४८ ४८ ८०० | २५६ ३१ ३४४ | ३४९ ६४ ५९० |
| ३०-०६-२०२५ ०५-०७-२०२५ | १४५ ०६ ३४९ | ४७० १४ ६९९ | ३३४ ०२ ६६० | ४७० १५ ७८० | ३६९ ८९ १२६ | २२३ ७५ २६७ |
| ०७-०७-२०२५ १२-०७-२०२५ | १८९ ८१ ३८० | २३३ ८८ २२४ | ३७८ ८८ १८९ | ६९९ ४१ ३३५ | २४८ ४८ १२५ | ४५८ ७७ ४६७ |
| १४-०७-२०२५ १९-०७-२०२५ | ७८९ ४४ २४८ | ११६ ८५ १४० | १३८ २८ १८९ | ३५९ ७२ १३८ | ६८९ ३६ २६८ | ६७८ १३ ३४८ |
| २१-०७-२०२५ २६-०७-२०२५ | ७९० ६८ ३५० | ६७८ १० २९९ | ३८९ ०५ ४५६ | ३७१ ७१ ६६९ | ३७८ ८२ ३४५ | १५० ६१ ६७८ |
| २८-०७-२०२५ ०२-०८-२०२५ | ३३४ ०५ १६८ | ५७८ ०८ ३५० | ३५९ ७६ १५० | ३६७ ६७ ५६६ | १९० ०३ २३८ | ४५६ ५८ ४५९ |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१-०६-२०२५ १४-०६-२०२५ | २४५ १४ ७७० | ४५० ९७ ५५७ | ५६० १२ ११० | १९० ०४ १४९ | २३९ ४४ २३९ | २४० ६४ २६६ |
| १६-०६-२०२५ २१-०६-२०२५ | ४८९ १२ ५७० | २४६ २१ ३४४ | १३७ १५ २५८ | ८०० ८७ १६० | ४५७ ६७ ४५८ | ५९९ ३५ ११३ |
| २३-०६-२०२५ २८-०६-२०२५ | ३५० ८३ ३५५ | ५७० २१ ४७० | १४५ ०६ ४५७ | २४७ ३३ ३०० | २४५ १० १२७ | ४५९ ८६ १५० |
| ३०-०६-२०२५ ०५-०७-२०२५ | २७८ ७४ ६८० | ५६७ ८९ ११७ | ८९९ ६२ ४९९ | १६७ ४६ २५९ | ५८० ३० ३३४ | १२० ३२ २५५ |
| ०७-०७-२०२५ १२-०७-२०२५ | ३७० ०४ २४८ | ६६० २९ ११७ | २२० ४५ ५५० | १२४ ७२ ६६० | २९० १६ १७८ | ३४७ ४० २४४ |
| १४-०७-२०२५ १९-०७-२०२५ | ३३९ ५५ ६९० | ५८९ २१ ६७८ | २४० ६१ ३८० | ९९० ८९ २३४ | १६९ ६८ ४६८ | ६६७ ९९ ५५९ |
| २१-०७-२०२५ २६-०७-२०२५ | १४६ १९ १९९ | ७८० ५४ २३९ | ३६८ ७० ५७८ | ११९ १३ २२९ | ५८९ २२ ३९० | ११८ ०६ १६९ |
| २८-०७-२०२५ ०२-०८-२०२५ | ५६० १० ५७८ | १५५ १७ ४४९ | २३६ ११ २९० | १२७ ०८ ४६८ | १२४ ७० ५६९ | २८८ ८२ २४६ |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| १६९ ६० ४७९ | ४९० ३७ ३७० | २३५ ०५ ७८० | २३५ ०३ ६८९ | १७७ ५५ २५८ | ३८९ ०२ ५८९ |
| ४९९ २२ ६८८ | २९० १३ ३५५ | ५७० २९ ३६० | २८० ०१ ५६० | १७७ ५९ ३७९ | ४४७ ५६ ३६७ |
| २५० ७० २९९ | १३६ ०९ ११७ | २७९ ८७ २७८ | ३५६ ४० ४७९ | ५६० १८ १७० | २३६ १० २८० |
| २४५ १९ ५५९ | ३६० ९८ ४५९ | ३५६ ४२ १२९ | ४६० ०९ ३६० | ५६० १८ ४६८ | ८९९ ६८ १२५ |
| ६७९ २५ १५९ | ५८९ २४ २४८ | ४०० ४६ ४५७ | ३५७ ५७ २२३ | ४७० १७ २७८ | ९९० ८५ ३४८ |
| २२४ ८१ ६७८ | ६६८ २४ २२० | २७८ ७५ १४० | १५९ ५८ २६० | ३३५ १० ४६० | ७९९ ५६ ३६७ |
| २६९ ७० १३६ | ४५६ ५२ १३८ | २३४ ९१ ५६० | १५७ ३८ २७९ | ३४८ ५२ ४८० | २३९ ४२ ५७० |
| ४६० ०१ २३६ | ११४ ६९ ४७८ | ४६० ०४ १६७ | ४५८ ७१ ५६० | ६८८ २१ १४६ | |

देशदूत 'CLASSIFIED'

सूचना वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत'वृतपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृतपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

**ज्योतीषविषयक**
जीवनातील कठिन व जटिल समस्यांचे, शिक्षण, नौकरी, व्यवसाय, प्रेम विवाह, कोर्ट कचेरी, स्वास्थ्य, कोणतेही कामात बाधा येणे, १०१% कायमस्वरूपी प्रभावी उपाय।तीन पीढ़ी पासून, श्रीभृगु ज्योतिष (मां गायत्री उपासक), गुजराल पेट्रोल पंप, जळगाव मो. ९८२२७७४१५१ (व्हीएम २५/६/२०२६)

**फेंगशुई**
सुख समृध्दीसाठी बिना तोड-फोड वास्तुदोष निवारण पारंपरीक वास्तु शास्त्र प्राचीन फेंगशुई द्वारे सर्व समाधन,फेंगशुई तज्ञ सुर्यवंशी 9881462286, (VM 23/05/26)

**दारु बंदीचा गुरुमंत्र**
द ग्रेट साईंटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसअॅप डॉ.पालवे, अॅडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... * व्यसन पेंशंटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....सर्व सुविधांना परीपुर्ण:-*व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...अॅडमिट सुविधा... *(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.(VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)

**वॉटर प्रुफिंग**
KM वॉटर प्रुफिंग 44 वर्षांपासून कामाचा अनुभव टेरेस, बाथरुम, संडास, बेसमेंट, पाण्याच्या टाकीची लिकेज 5 ते 10 वर्षांच्या 100% गॅरंटीने विनातोडफोड करुन मिळेल. संजय कुमावत-9822275444, संतोष कुमावत-7038818444 (25/8/25)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**
जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/चिकून गुनिया,जुनाट अॅलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752(VM.10/01/26. CRINIV-2425JL/CRG00505)

**इलेक्ट्रॉनिक वजनकाटे**
मान्सुन ऑफर जुने द्या नविन घ्या एक्सचेंज ऑफरमध्ये फिनिक्स,सॅनसुई, हॅवल्स, एक्सपर्ट, इगल सर्व ब्रान्डेड कंपन्याचें इलेक्ट्रॉनिक वजनकाटे होलसेल किमंतीत मिळवा,अधिकृत विक्री व दुरुस्ती,धनश्री इलेक्ट्रॉनिक्स, १७९,डी-विंग,गोलाणी मार्केट,जळगाव 9823095738.(VM 07/07/26).

**१००% व्यसनमुक्ती**
*गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क:9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगाव. (VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!